17 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

लोकमत



डॉ. देवानंद शिंदे



आ. हसन मुश्रीफ,



प्रा. आनंद भोजणे



नामदेव कांबळे



बबनराव रानगे

# डिगे फौंडेशनचे 'समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार' जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फौंडेशनच्यावतीने यंदा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, आमदार हसन मुश्रीफ, प्रा. आनंद भोजणे, नामदेव कांबळे, बबनराव रानगे यांना समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. १३ एप्रिल रोजी पुरस्कार प्रदान सोहळा होणार असल्याची माहिती फौंडेशनचे अध्यक्ष सदानंद डिगे यांनी दिली.

माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फौंडेशनच्यावतीने रविवारी एस. के. डिगे यांची १०४ वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त शाहू स्मारक येथे आयोजित पत्रकार परिषदेत या समाजरत्न भीमक्रांती पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यावेळी प्रभाकर कांबळे, महादेव कांबळे, धोंडिराम कांबळे, अशोक भास्कर, प्रा. अतुल कांबळे, रूपाली कांबळे, दीपक कांबळे, हेमंत कांबळे उपस्थित होते.

सदानंद डिगे म्हणाले, माजी खासदार डिगे मेमोरियल फौंडेशनच्यावतीने प्रतिवर्षी फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचाराने कार्यरत व्यक्तींचा गौरव केला जातो. यावर्षी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आमदार हसन मुश्रीफ, सुवर्णपदक विजेते प्रा. आनंद भोजणे, कोल्हापूर अर्बन बँकेचे संचालक नामदेव कांबळे, मल्हार सेनेचे राज्य अध्यक्ष बबनराव रानगे यांना समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच माजी कृषी अधिकारी शिवाजी वर्धन यांचा धम्म प्रसारक पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे.

फौंडेशनचे सचिव प्रभाकर कांबळे म्हणाले, फौंडेशनच्यावतीने डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त १२ ते १४ एप्रिल या काळात भीम फेस्टिव्हल आयोजित केला जाणार आहे. फेस्टिव्हलमध्ये १३ एप्रिल रोजी शाहू स्मारक येथे समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# कुलगुरू डॉ. शिंदे, मुश्रीफ यांना भीमक्रांती पुरस्कार

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनच्यावतीने दिला जाणारा समाजरत्न भीमक्रांती पुरस्कार यंदा कुलगुरू देवानंद शिंदे, आमदार हसन मुश्रीफ, प्रा. आनंद भोजने, नामदेवराव कांबळे व बबनराव रानगे यांना जाहीर झाला आहे. १३ एप्रिल रोजी, शाहू स्मारक भवनात दुपारी ३ वाजता होणार या पुरस्कारांचे वितरण होणार असल्याची माहिती फाऊंडेशनचे अध्यक्ष सदानंद डिगे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

डिगे म्हणाले, 'माजी खासदार एस. के. डिगे यांच्या १०४ व्या जयंतीचे औचित्य साधून समाजोपयोगी विविध क्षेत्रात फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारावर काम करणाऱ्या या व्यक्तींना समाजरत्न भीमक्रांती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्य १२ ते १४ एप्रिल या कालावधीत भीम फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पुरस्कार, व्याख्यान, निबंध स्पर्धा, एकांकिका, आरोग्य शिबिर, भारतीय संविधानाची माहिती, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य, अंध व अपंग मुलांना भोजन, प्रबोधनात्मक आतषबाजी असे विविध कार्यक्रम होणार आहेत. यावेळी प्रभाकर कांबळे, महादेव कांबळे, धोंडीराम कांबळे, अशोक भास्कर, प्रा. अतुल कांबळे, रुपाली कांबळे, दीपक कांबळे, हेमंत कांबळे आदी उपस्थित होते.

17 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

**शिवाजी विद्यापीठाची कार्यवाही : 'बी. टेक.'बाबतच्या सुविधेला फेब्रुवारीपासून प्रारंभ**

# परीक्षा शुल्क भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन!

संतोष मिठारी • कोल्हापूर

पदवी प्रमाणपत्र, चर्चासत्रांसाठीच्या नोंदणीनंतर आता विविध अभ्यासक्रमांसाठीचे परीक्षा आणि शैक्षणिक शुल्क ऑनलाईन भरण्याच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाने पाऊल टाकले आहे. विद्यापीठातील बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी (बी. टेक.) विद्याशाखेअंतर्गत सहा अभ्यासक्रमांसाठी या स्वरुपातील ऑनलाईन सुविधेची प्रायोगिक कार्यवाही केली जाणार आहे. फेब्रुवारीमध्ये त्याची सुरुवात होईल.

विद्यापीठाने विद्यार्थी केंद्रित सुविधांतर्गत जुलैमध्ये 'पेमेंट गेट-वे'ची सुविधा कार्यान्वित केली. त्याची सुरुवात पहिल्या टप्प्यात पदवी प्रमाणपत्राचे शुल्क भरुन घेण्यासाठी करण्यात आले. याअंतर्गत १९ हजार ८२८ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पदवी प्रमाणपत्राचे शुल्क भरले आहे. 'पेमेंट गेट-वे'च्या पदवी प्रमाणपत्रासाठीच्या यशस्वी पावलानंतर कॅशलेस व्यवहारासाठी विद्यापीठ प्रशासनाने कार्यवाही सुरु केली आहे. त्याअंतर्गत बी. टेक. विद्याशाखेतील इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हील, मेकॅनिकल, केमिकल, ईएनटीसी आणि कॉम्प्युटर या अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सत्रातील परीक्षा शुल्क हे 'पेमेंट गेट-वे'च्या माध्यमातून ऑनलाईन भरण्याची प्रायोगिक स्वरुपातील कार्यवाही केली जाणार आहे. सध्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर शुल्काचा धनादेश अथवा चलन करुन ते अर्जासमवेत जोडावे लागते. धनादेश काढल्यानंतर त्यासाठी अतिरिक्त शुल्क अदा करावे लागत होते. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसादेखील खर्च होतो. हे टाळण्यासाठी डेबिट, क्रेडिट कार्डच्या माध्यमातून ऑनलाईन शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जात आहे.

## अतिरिक्त शुल्काबाबत दक्षता



सध्या विविध ठिकाणी कार्ड स्वाईपद्वारे व्यवहार केल्यानंतर, शुल्क भरल्यानंतर एक-दोन टक्के अतिरिक्त शुल्काचा भार पडत आहे. अशा स्वरुपातील अतिरिक्त भार विद्यार्थी अथवा विद्यापीठावर पडू नये याची दक्षता घेतली जाणार आहे.

> अनेक विद्यार्थ्यांना विविध प्रवेश परीक्षा, अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे शुल्क भरण्यासाठी अनेकदा विद्यापीठ, महाविद्यालयात यावे लागते. त्यांचा वेळ आणि पैसे वाचविण्यासाठी विद्यापीठाने ऑनलाईन शुल्क भरुन घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. बी. टेक. विद्याशाखेतील द्वितीय सत्रातील परीक्षा, पीएच. डी. प्रवेश परीक्षांचे शुल्क ऑनलाईन भरुन घेण्याची सुविधा फेब्रुवारीपासून उपलब्ध करुन देण्यात येईल.
>
> \- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव

17 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# मार्चपासून नव्या विद्यापीठ कायद्यानुसार कारभार

कोल्हापूर : प्रतिनिधी

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक २०१६ हा कायदा विधानसभेत संमत झाल्यानंतर या कायद्यावर राज्यपाल सी. विद्यासागर यांची आता स्वाक्षरी झाली असून लवकरच या कायद्यासंदर्भात अध्यादेश जारी होणार आहे. त्यामुळे राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर यासह ११ पारंपरिक विद्यापीठांत येत्या मार्चपासून नवा कायदा येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मार्चपासून शिवाजी विद्यापीठाचा कारभारही नव्या कायद्यानुसार होणार आहे.

नवा विद्यापीठ कायदा येणार म्हणून सर्व विद्यापीठांच्या अधिसभेसह सर्वच प्राधिकरणांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. कायद्याअभावी अधिसभेची निवडणूकही स्थगित आहे.



**■ राज्यपालांची स्वाक्षरी : अंमलबजावणीसंदर्भात अधिकाऱ्यांच्या बैठका**

**■ शिवाजी विद्यापीठाची प्रशासकीय स्तरावर पूर्वतयारी : डॉ. नांदवडेकर**

विद्वत परिषद, व्यवस्थापन परिषद, परीक्षा मंडळ, अभ्यास मंडळ, विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तक्रार निवारण समिती अशी विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांचा कारभार हा मोजक्या काही पदसिद्ध अधिकाऱ्यांमार्फत सध्या चालवला जात आहे. या निर्णयप्रक्रियेमध्ये विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांचा समावेश नसल्याने त्याचा एकूण कामकाजावर परिणाम होत आहे. येत्या दोन महिन्यांत सर्व शासकीय सोपस्कार पूर्ण करून नवा कायदा अंमलात आणला जाणार आहे. हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर विद्यापीठांतही निवडणुकांचे वारे वाहणार आहे. पदवीधर मतदारांची नोंदणी तसेच विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**नव्या कायद्यात विद्यार्थ्यांचा सर्व प्रक्रियेत सहभाग**

नव्या कायद्यात विद्यार्थी केंद्रीत रचना व निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यात आला आहे. अभ्यासमंडळांमध्ये गतवर्षीच्या प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यास सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाणार असून नवीन अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीबाबत अशा हुशार विद्यार्थ्यांची मते उपयोगी ठरतील. अधिसभेमध्ये विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष व सचिवाचे प्रतिनिधीत्व सुचवण्यात आले असून विद्यार्थी विकास मंडळ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आदी समित्यांमध्ये विद्यार्थ्यांना प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. तसेच विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये देखील विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षाला निमंत्रित सदस्य करण्यात आले आहे .

कॉलेज विकास समितीमध्ये देखील महाविद्यालयीन विद्यार्थी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आल्यानंतर मार्च आणि एप्रिलमध्ये सर्वच विद्यापीठांत अधिसभा तसेच प्राधिकरणांच्या सदस्यांच्या निवड प्रक्रियेची धांदल उडणार आहे.

> “ शिवाजी विद्यापीठाने नव्या कायद्याच्या नियोजनासाठी तत्काळ अभ्यास गटाची नियुक्ती करून कार्यवाहीस सुरुवात केली आहे. अभ्यास गटाच्या मार्गदर्शनाखाली नव्या कायद्याची माहिती व जनजागृतीसाठी चर्चासत्र तसेच अधिकारी, कर्मचारी संघटनांच्या आदींच्या तीन बैठका घेण्यात आल्या आहेत. नव्या कायद्याच्या पूर्वतयारीबाबत विद्यापीठ अग्रेसर असून प्रशासकीय स्तरावर चांगली पूर्वतयारी झाली आहे.
>
> **- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 JAN 2017

लोकमत

# राज्यशास्त्र विभागात पालकांचा संवाद

## शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रम : शिक्षक, विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापकांसमवेत तेथील विद्यार्थ्यांच्या पालकांनी संवाद साधला. यात त्यांनी राज्यशास्त्र विषय, शेतकऱ्यांचे दु:ख, विद्यापीठातील वातावरण आदींबाबत भावना व्यक्त केल्या.

राज्यशास्त्र विभागामध्ये शिक्षक, पालक, विद्यार्थी संवाद कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी सिद्धेवाडीच्या सरपंच छाया चव्हाण प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील होत्या. कार्यक्रमात 'राज्यशास्त्र विषय पाल्य शिकतो. त्यामुळे तो समाजातील विविध गोष्टींवर सडेतोड मते मांडू शकतो', 'विद्यार्थ्यांनी वर्गात बसावे' अशा अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यात काही शेतकरी पालकांनी आपल्या घरातील पहिलाच मुलगा, मुलगी शिकते असे सांगितले. शेतकऱ्यांचे दु:ख त्यांनी मांडले. राज्यशास्त्र हा विषय शिकतो याचा त्यांचा पालकांना अभिमान वाटतो. मुलींसाठी शिवाजी विद्यापीठामधील शैक्षणिक वातावरण उत्साही असल्याचे मत मांडले. चर्चेत राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, रवींद्र भणगे यांनी सहभाग घेतला. सूर्यकांत गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. भगवान माने यांनी आभार मानले. संयोजन सचिन भोसले यांनी केले. (प्रतिनिधी)

### कार्यक्रमात सहभागी झालेले मान्यवर पालक

या कार्यक्रमात जे. एस. गजगेश्वर (कोल्हापूर), भारती पाटील (तिरपण), विलास यादव (येरवळे), शंकर पोवार (यवलूज), शंकर खाडे (पेठवडगांव), कल्पना खेमे (फुलेवाडी), बळवंत पाटील (बेलवळे), विशाल दिपंकर (निगवे), बाळासाहेब पाटील (वाळवे खु.), करणसिंह सरनोबत (आसुर्ले), रमेश जगदाळे (रेंदाळ), छाया चव्हाण (सिद्धेवाडी), अशोक देवेकर, प्रियंका देवकर, विशाल कुरणे (पेठवडगांव), कल्लाप्पा बाबू अमिनभावी यांनी संवाद साधला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 JAN 2017

लोकमत

## 'सामाजिक वंचितता' केंद्राची कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राने शुक्रवारी (दि. २०) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. 'लैंगिक अल्पसंख्याक व सामाजिक वंचितीकरण' असा कार्यशाळेचे विषय आहे. विद्यापीठातील गणित विभागाच्या रामानुजन हॉलमध्ये सकाळी साडेदहा वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होईल. त्यात बिंदुमाधव खिरे (पुणे), मीना शेषू (सांगली), प्रा. डॉ. राजन गवस, डॉ. जगन कराडे (शिवाजी विद्यापीठ), गौरी सावंत (मुंबई) हे मार्गदर्शन करणार आहेत.